॥ज्योतिर्मय॥
Online Journal of Literature....
साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २६६ वा ❑ शुक्रवार दि.१९ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

# सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

सार्वजनिक ठिकाणी महिलांची होणारी अभद्र टीका व वर्तन ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे, ज्यात महिलांना अपमानास्पद शब्द, अश्लील हावभाव आणि अनावश्यक स्पर्श यांचा सामना करावा लागतो, ज्यामुळे त्यांना असुरक्षित वाटते आणि सार्वजनिक ठिकाणे वापरणे कठीण होते.महिलांची सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा ही फक्त वैयक्तिक सुरक्षिततेचा प्रश्न नाही, तर समानता आणि स्वातंत्र्याचा प्रश्न आहे. संविधान प्रत्येक महिलेला प्रतिष्ठेसह जगण्याचा, मोकळेपणाने फिरण्याचा आणि भीतिशिवाय समाजात सहभाग घेण्याचा हक्क देतो. तरीही, रस्ते, कामाचे ठिकाणे आणि सार्वजनिक वाहतूक यांसारख्या ठिकाणी छळ, हल्ला आणि त्रासाच्या घटना अजूनही घडत आहेत. भारतीय दंडसंहिता, कामाच्या ठिकाणी महिलांवरील लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा आणि विविध सरकारी योजना या समस्या सोडवण्यासाठी अस्तित्वात आहेत. तरीही, खरी सुरक्षा मिळवण्यासाठी फक्त कायद्यांनीच पुरेसे नाही; त्यासाठी जनजागृती, जबाबदारी आणि सामाजिक सहकार्यही आवश्यक आहे

अलीकडेच केरळच्या सीपीएम नेत्याने महिलांबाबत एक वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. ज्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे.सीपीएमचे स्थानिक नेते भाषण करत होते. त्यावेळी त्यांनी महिलांबाबत वादग्रस्त वक्तव्य केलं. त्यांचा निवडणुकीत विजय झाला. त्यांनी विजयानंतर झालेल्या रॅलीत भाषण केलं आणि ते म्हणाले, ''ज्या महिला लग्न करुन एका कुटुंबाचा भाग होतात त्यांनी मतदान करण्यासाठी अनोळखी लोकांसमोर यायला नको. तसंच महिलांचा राजकीयदृष्ट्या कुणीही वापर करायला नको. महिला लग्न करतात कारण त्यांना त्यांच्या पतींसह झोपायचं असतं. लग्न झालेल्या महिलेचं काम पतीसोबत शय्यासोबत करणं इतकंच असतं.'' महिलांबाबत हे वक्तव्य केल्याने माजिद यांच्यावर सोशल मीडियावरुन प्रचंड टीका केली जाते आहे. मात्र धक्कादायक बाब ही ज्या भाषणाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे त्या भाषणात माजिद यांच्या वक्तव्यानंतर लोक टाळ्या वाजवतानाचा आवाज येतो आहे.

नितीश कुमार यांनी सोमवारी १५ डिसेंबर) एकूण १२८३ आयुष डॉक्टरांना नियुक्तीपत्र दिले. त्यासाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात नितीश कुमार यांनी काही डॉक्टरांना मंचावर बोलवून नियुक्तीपत्र सोपवले. यामध्ये नुसरत परवीन या मुस्लीम महिला डॉक्टरांचाही समावेश होता. नितीश कुमार यांनी याच महिला डॉक्टरचा हिजाब हातांनी ओढला आहे. या घटनेचा व्हिडीओ सध्या सगळीकडेच व्हायरल होत असून नितीश कुमार यांच्यावर टीका केली जात आहे.

या कार्यक्रमात डॉक्टर नुसरत परवीन नियुक्तीपत्र घेण्यासाठी मंचावर गेल्या. त्यानंतर नितीश कुमार यांनी नियुक्तीपत्र देण्याआधी परवीन यांना तुम्ही डोक्यावर काय लावले आहे, असे विचारले. या प्रश्नाचे उत्तर म्हणून परवीन यांनी हा हिजाब आहे, असे सांगितले. त्यानंतर नितीश कुमार यांनी नियुक्तीपत्र देण्याआधी आपल्या हातांनी नुसरत परवीन यांच्या चेहऱ्यावरील हिजाब स्वत:च्या हातांनी ओढला. त्यानंतर परवीन यांचा चेहरा दिसायला लागला. हा सर्व प्रकार पाहून परवीन थोड्याशा गोंधळल्या. तर तिथे उपस्थितांमध्ये हशा पिकला. परवीन यांचा हिजाब ओढल्यानंतर नितीश कुमार यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले.

आज पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया कुठेही कमी नाही.आज प्रत्येक क्षेत्र स्त्रियांनी पादाक्रांत केले आहे तरी देखील. समाजात महिलांना दुय्यम स्थान दिले जाते, ज्यामुळे त्यांच्यावर अत्याचार करणे सामान्य मानले जाते.यामुळे महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते. महिलांना नेहमीच बळी म्हणून पाहिले जाते, ज्यामुळे त्यांच्यावर लक्ष ठेवणे आणि त्यांना नियंत्रित करणे सोपे होते, असे काही पुरुषांना वाटते.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी अनेक कायदे करण्यात आले आहे तरी देखील महिलांवर होणारे अत्याचार चिंताजनक आहे.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी अनेक कठोर कायदे (जसे की अंतर्गत), महिलांच्या तक्रारींसाठी सोप्या यंत्रणा (उदा. पोलीस हेल्पलाइन १०९१, हेल्पलाइन १८१) आणि समाजातील पुरुषांमध्ये स्त्री–सन्मानाची भावना रुजवूनच तोडगा काढता येऊ शकतो, ज्यामुळे महिलांना सुरक्षित आणि सन्मानपूर्वक सार्वजनिक स्थळी वावरता येईल. केवळ कायदा करून महिला सुरक्षित राहणार नाही..

सार्वजनिक ठिकाणी महिलांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी फक्त कायदे असणे पुरेसे नाही; त्यासाठी योग्य अंमलबजावणी, समाजाची जागरूकता आणि नागरी जबाबदारीही आवश्यक आहे. संविधानिक हक्क, भारतीय दंडसंहिता आणि कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा यासारखी विशिष्ट कायदे मजबूत कायदेशीर चौकट तयार करतात. न्यायालयीन हस्तक्षेप, सरकारी उपाययोजना आणि नागरी उपाय यामुळे संरक्षण अधिक मजबूत होते. तरीही, अपराधाची तक्रार न करणे, पोलिसांची अपुरी प्रतिसादकुशलता आणि शहरी नियोजनातील त्रुटी यांसारख्या अडचणी कायम आहेत. कायदे, प्रशासन, शहरी रचना, समुदायाचा सहभाग आणि जनजागृती यांचा एकत्रित प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. शेवटी, सुरक्षित आणि सर्वसमावेशक वातावरण महिलांना आपले हक्क मोकळेपणाने वापरण्याची संधी देते आणि समाज अधिक समान आणि न्यायप्रिय बनतो.

# ‘ती’ चे नाटक एक नंबर

## ६४ व्या राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचा निकाल जाहीर

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाने घेतलेल्या ६४ व्या राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी छत्रपती संभाजीनगर केंद्रावर उत्साहात पार पडली. यात जालन्याच्या ती या नाटकाने प्रथम पारितोषिक पटकावले. तापडिया नाट्य मंदिरात झालेल्या या स्पर्धेत एकूण १४ नाट्य प्रयोगांचे सादरीकरण झाले. महोत्सवातील नाटकांना सुमारे ४ हजार प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसद मिळाला.



संभाजीनगर केंद्रावर १४, तर उपकेंद्र बीड येथे ६ नाट्य प्रयोग सादर झाले. ती ला प्रथम क्रमांक या स्पर्धेत बीड केंद्रातून सहभागी नाट्यांकुर, जालना या संस्थेच्या ती या नाटकाने प्रथम पारितोषिक पटकावले. ज्ञानज्योत शिक्षण संस्था, जालना यांच्या टेक अ चान्स या नाटकास द्वितीय पारितोषिक, तर सुंदरेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, जालना यांच्या उत्क्रांत या नाटकास तृतीय पारितोषिक जाहीर झाले. प्रथम व द्वितीय विजेती नाटके अंतिम फेरीसाठी निवडली गेली. हा निकाल सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी जाहीर केला. शैक्षणिक, प्रबोधनात्मक विषयांसहमहिला सशक्तीकरण, तृतीयपंथीयांच्या समस्या, ग्रामीण, शेतकऱ्यांच्या व्यथा प्रभावीपणे मांडण्यात आल्या.

उत्कृष्ट अभिनय : सुमित शर्मा (ती), मुक्ता वळसे (टेक अ चान्स), दिग्दर्शन : प्रथम : सुमित शर्मा (ती), द्वितीय : रत्नदीप वाव्हळे (टेक अ चान्स), तृतीय : विनायक पाटील (उत्क्रांत). संगीत दिग्दर्शन : प्रथम : अभिनय जाधव (हिरण्यकश्यपू), द्वितीय : नीलेश सपकाळ (ती),

तृतीय : सौरभ मांडवकर (उत्क्रांत), प्रकाश योजना : प्रथम : वाल्मिक जाधव (उत्क्रांत), द्वितीय: प्रसाद वाघमारे (हिरण्यकश्यपू)

तृतीय : अभय एरंडे (केस नं. ९९). नेपथ्य : प्रथम रामेश्वर देवरे (उत्क्रांत), द्वितीय : बबन राऊत (विठ्ठल विठ्ठल), तृतीय : अमोल जाधव (टेक अ चान्स). रंगभूषा : प्रथम वर्षाराणी कोळवले (ती), द्वितीय : अजित सकपाळ (विठ्ठल विठ्ठल), तृतीय : कविता दिवेकर (उत्क्रांत)

वेशभूषा : प्रथम कविता दिवेकर (उत्क्रांत), द्वितीय : संध्या शर्मा (ती), तृतीय : अजित सपकाळ (विठ्ठल विठ्ठल). परीक्षक म्हणून देवदत्त पाठक, संजय देखणे आणि ज्योती निसळ यांनी काम पाहिले.

# मराठी भाषेचे वाङ्मय पुरस्कार आता विश्वकोश मंडळाकडे होणार वर्ग

## अध्यक्षांच्या मर्जीसाठी मराठी भाषा विभागाचे लोटांगण, आज महत्त्वाची बैठक

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ रवींद्र शोभणे यांची मर्जी राखण्यासाठी मराठी भाषा विभागाने आत्तापर्यंत राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून दिले जाणारे वाङ्मय पुरस्कार विश्वकोशकडे वर्ग करण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. यासाठी लवकरच शासन निर्णय जाहीर केला जाणार आहे. तर अध्यक्षांच्या मर्जीसाठीच या निर्णयापूर्वी मराठी भाषा विभागाची आज मुंबईत बैठक होणार असून या बैठकीमध्ये पुरस्कार वर्ग केल्यानंतर यामध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नावाने नवीन पुरस्कार देण्याची देखील घोषणा केली जाणार असल्याचे मंत्रालयातील अधिकारी सूत्राकडून सांगण्यात आले.

मागील दीड वर्षात विश्वकोश मंडळाच्या वाई येथील मुख्य कार्यालयात केवळ तीन वेळा भेट दिलेले आणि आत्तापर्यंतच्या विश्वकोशच्या इतिहासात सर्वात निष्क्रिय अध्यक्ष म्हणून ओळख निर्माण केलेले डॉ. शोभणे यांना वाङ्मय पुरस्कार आणि त्याचे अधिकार आपल्याकडे हवे आहेत. यासाठी त्यांनी विभागाला वेठीस धरून ते अधिकार आपल्याकडे मिळवून घेण्यात यश मिळवले आहे. यासाठीच त्यांनी मराठी भाषा विभागाचे प्रधान सचिव डॉ किरण कुलकर्णी यांना गळ घालण्यात ते यशस्वी झाले असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

डॉ. शोभणे यांना आपण काहीतरी वेगळे करतोय, हे दाखवण्यासाठी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नावाने आपल्या मर्जीतील लोकांना पुरस्कार द्यायचे आहेत. त्यामुळे त्यांनी आतापर्यंत साहित्य संस्कृती मंडळाकडे पुरस्कार जाहीर करणे आणि निवड करणे याची असलेले अधिकारच आपल्याकडे घेऊन त्यांना यापुढे विश्वकोश मंडळाकडून हे सर्व पुरस्कार द्यायचे आहेत. यातून त्यांच्या मर्जीतील अनेक त्यांच्याच पठडीतील लोकांना पुरस्कार देण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याने या प्रक्रियेवरच साहित्याच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वादाला तोंड फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे अगोदरच कामाचा व्यापाखाली दडपून गेलेल्या विश्वकोश मंडळावर मात्र या पुरस्कार निवडीचा व्याप वाढणार असल्याने तेथील मूळ संशोधन आणि इतर कामकाजावर मोठे परिणाम होण्याची शक्यता आहे निर्माण होणार आहे.

### मुंबईतील कार्यालय अडचणीत

मुंबईतील प्रभादेवी येथे असलेल्या पू. ल. देशपांडे अकादमीत महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे मुख्य कार्यालय आहे. तर विश्वकोश मंडळाचे मुंबईतील कार्यालयीन कामकाजासाठी ची व्यवस्था याच ठिकाणी करण्यात आली आहे. मात्र या ठिकाणी आता मराठी भाषा विभागाच्या मंत्र्यांचे कार्यालय होत असल्याने साहित्य संस्कृती मंडळाचे कार्यालय धोक्यात आले आहे. हे कार्यालय तयार करण्यासाठी साहित्य संस्कृती मंडळाचे सर्व साहित्य मंडळाच्या अध्यक्षाच्या दालनात कोंडून टाकण्यात आले असून दुसरीकडे विश्वकोश चे देखील कार्यालय एका कोपऱ्यात टाकले जाणार आहे, यामुळे या कार्यालयाच्या विषयावरून देखील मोठे वाद समोर येणार आहेत.

# वाचनाने तरुणांना योग्य दिशा मिळते-प्रवीण तरडे

## सुनील वारेंच्या यशाचे वारेचे प्रकाशन



ज्योतिर्मय साहित्य

पुणे – वाचन संस्कृती व वाचनाने आजच्या तरुणांना भविष्याची दिशा आणि मार्ग मिळण्यास मदत होत असते आणि अशा निवडक पुस्तकापैकी सुनील वारे यांच्या यशाचे वारे हे एक पुस्तक असल्याचे मत प्रसिद्ध सिने निर्माता, दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे यांनी व्यक्त केले. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी सुनील वारे यांच्या यशाचे वारे या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पुणे बुक फेस्टिवल मध्ये पार पडला त्यावेळी ते बोलत होते.

पुढे ते म्हणाले की, कथा, कादंबऱ्या यासह विविध ललित साहित्याबरोबरच आजच्या स्पर्धे च्या युगात तरुणांना मार्गदर्शन ठरावे असे फार कमी साहित्य उपलब्ध आहे, त्यामुळे यशाचे वारे या पुस्तकाचा सर्वांना अतिशय उपयोग होईल असे प्रवीण तरडे म्हणाले.

सुनील वारे यांनी आपल्या मनोगतात पुस्तकातील संदर्भ देत आजच्या तरुणाला यश संपादन करण्यासाठी लागणाऱ्या विविध गोष्टीचा उहापोह पुस्तकात असल्याचे त्सांगितले.

यावेळी प्रमुख मान्यवरांचे स्वागत माय मिरर प्रकाशनाचे प्रकाशक मनोज अंबिके यांनी केले. या प्रकाशन समारंभास सिनेअभिनेते, दिग्दर्शक प्रवीण तरडे, लेखक सुनील वारे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे अध्यासन पुणे विद्यापीठाचे सुनील भणगे, आरती वारे, मनोज अंबिके आदि प्रमुख मान्यवर उपस्थित होते.






# जात्यावरच्या ओव्या......

देवाजीच्या पुजेपाशी
मन लागले लागले
समईच्या उजेडात
माझे मी पण गळले ||४०३||

देवाजीची पुजा
मला वाटते पावन
बोलापरीस राहाव
साधू संताचं सांगणं ||४०४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758





# रंगोली सजाओ रे...

ज्योतिर्मय साहित्य

रांगोळी आपल्यातल्या कलेला वाट करून देते. मनातल्या भावभावना जशा चित्राच्या माध्यमातून एखादा कुशल चित्रकार कागदावर मूर्त स्वरुपात व्यक्त करतो, तशाच भावभावना रांगोळीतून सुद्धा व्यक्त करता येतात. आधी चित्र मनात असते. मनातले चित्र मग रांगोळीच्या रूपाने साकार होते. मनातले रंग चित्रात उतरतात. आकर्षक रंगसंगतीने रांगोळी खुलून दिसते. चित्रकाराच्या कुंचल्याप्रमाणे रांगोळी काढणाऱ्या बोटांमधेही जादू असते. रांगोळीच्या आकर्षक आणि रेखीव रेषा चित्राला म्हणजेच रांगोळीला सजीवता प्रदान करतात. रांगोळी काढणारे कुशल हात जेव्हा एखाद्या व्यक्तीचे चित्र काढतात तेव्हा त्या रांगोळीच्या रेषा चेहऱ्यावरील आनंद, दुःख, आश्चर्य, शांतता इ. भाव सुद्धा व्यक्त करतात.

आता तर रांगोळीचे कितीतरी प्रकार आणि साधने आपल्याला उपलब्ध झाली आहेत. ज्यांना फारशी चांगली रांगोळी काढता येत नाही, किंवा रांगोळी घालायला वेळ नाही अशांसाठी रांगोळ्यांचे छापे उपलब्ध झाले आहेत. त्यात रांगोळी भरली की झाले ! रांगोळीचे पेन, रेडीमेड रांगोळीचे स्टिकर्स उपलब्ध आहेत. आपल्या नेहमीच्या रांगोळीसोबत संस्कार भारतीची रांगोळी, पाण्यावरील रांगोळी, पानाफुलांची रांगोळी असे रांगोळीचे कितीतरी प्रकार आहेत. रांगोळी काढलेले अंगण किती सुंदर दिसते ! देवघरापुढे काढलेली रांगोळी, एखाद्या मंगल कार्याच्या प्रसंगी काढलेली रांगोळी त्या कार्याला पावित्र्य आणि मांगल्याची जोड देते. रांगोळी म्हणजे जणू सौंदर्य आणि मांगल्य यांचा सुरेख संगम ! जेवणाची पंगत असेल तर पानाभोवती काढलेली रांगोळी आपले मन प्रसन्न करते. रांगोळी जणू त्या पंगतीला प्रेम, कौटुंबिक जिव्हाळा आणि पावित्र्य प्रदान करते.



कशासाठी काढतो आपण रांगोळी ? केवळ घर, अंगण सुशोभित करण्यासाठी ? ते तर आहेच पण आपल्यातील कला व्यक्त करण्याचे ते एक सुंदर माध्यम आहे. रांगोळीमध्ये एक प्रकारची सकारात्मक उर्जा असते. आपल्या अंगणात घातलेली सुंदर रांगोळी घराला सकारात्मक उर्जा प्रदान करते. नकारात्मक गोष्टींपासून दूर ठेवते. खरोखर रांगोळी हे भारतीय संस्कृतीचे एक खास वैशिष्ट्य आहे ! आजकाल रांगोळी काढण्यासाठी घरापुढील अंगणाचा संकोच झाला असला तरी भारतीय स्त्री असेल त्या उपलब्ध जागेत रांगोळी काढते. घराला पावित्र्य आणि मांगल्य प्रदान करते. नकारात्मक गोष्टी, वाईट भावभावनांपासून घराला दूर ठेवते.

असे हे रांगोळीचे रंग आपले जीवनही आकर्षक करोत, त्यात आनंदाचे, सुखाचे रंग भरोत. आपले जीवन हे सुद्धा एका सुंदर आकर्षक रांगोळीप्रमाणे होवो की जे इतरांना आनंद देईल, सकारात्मक उर्जा प्रदान करील. ***



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# अनिर्वाच्यनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

मित्रांनो, आपण आता ४० व्या ओवीपर्यन्त आलो आहोत. संपूर्ण समास तत्वज्ञानावर आहे.

शुध्द व सरळ तर्काने या अद्वेतमय सहजस्थितीची चर्चा व चिकित्सा केली तर आपण सध्या भ्रमात वावरतो एवढी आपल्या बुध्दीची जाणीव होते.

''मी अज्ञानी आहे''ही खात्री करून देणे हेच परमार्थाच्या क्षेत्रात माणसाच्या बुध्दीचे मोठे कौतुक आहे. मन अर्थरूप केले की आत्मज्ञानाने मिळणाऱ्या समाधानावर परमोच्च पातळीवर साधक पोहचतो. त्याच्या चित्तवृत्तीत स्वानंद असतो. अद्वैताच्या विवेचनामध्ये जेवढे ज्ञान सांगितले ते शब्दरूप असल्याने मायेच्या क्षेत्रात येते.

देहबुध्दीला ते खरे वाटले तरी स्वरूपानुभावाच्या बाजुने स्वप्नातील ज्ञाना प्रमाणेचं आहे.

एकदा का आत्मसाक्षात्कार झाला की ते आपोआप नाहीसे होते. मग शब्दांच्या पलीकडे असणारे स्वानंद सुख तेवढे शिल्लक रहाते।

४२ वी ओवी तर आपल्याला खुप मोठे ज्ञान सांगुन जाते. समर्थ म्हणतात.''आत्मज्ञानामध्ये संपूर्ण एकरूपता असते अनुभव व अनुभव घेणारा हे तिथे नसतात. तेथे शब्दज्ञानाला वाव नसतो. ज्ञानाच्या या अवस्थेत साधक अत्यंत शांत व स्वस्थ असतो

सद्गुरूच्या चरणीं सतत राहुन त्यांना शरण जाऊन,त्यांच्या तोंडचे शुध्द आत्मस्वरूपाचे निरूपण स्मरणात ठेवून सतत जागृत रहावे.हळूहळू आत्मसाक्षात्कार होऊ लागतो. परमपदाला पोहचण्यासाठी ज्ञान,निष्ठा वलयांकारी बैठक तयार होते. आपल्याला वाटते की जागृत अवस्था म्हणजे ती हीच असते.


पण हा केवळ भ्रम असतो. दृश्याचा अनुभव लयाच्या अनुभवात विरतो. शुन्याच्यापलीकडे अनुभव अनुभवरूपतेमध्ये विरून जातो. ''मी अनुभव घेतो'' या स्वप्नात्च असतो.

५० च्या पुढच्या ओव्यात तर ''अनिर्वाच्यनिरूपण''चा थोडक्यात सारांश सांगितला आहे. तो पुढील प्रमाणे .

तूं जागा झाला आहे पण तुझे स्पप्न अजूनही पूर्ण झाले नाही. ''मी तो आजन्मा आहे'' असे तूं स्वप्नात म्हणतो. याचा अर्थ तुझ्या जागेपणात स्वप्नाची महती संपत नाही. यालाच तर सहजस्थिती म्हणतात. सहजस्थिती असते यालाच ''विवेकाचा पाया'' म्हणतात. कोणत्याही बाबतीत सहजस्थिती, विवेक, वैराग्याची जाणीव नेणीव, जागृत पणे डोळसपणे सर्वावर समाधान मानावे ही तर विवेकाची ओळख आहे.

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ
समास १० वा समाप्त, दशक ६ वा समाप्त

***



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण

ज्योतिर्मय साहित्य


जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दु:ख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दु:ख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दु:ख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।

## ॥ अनुभूती ॥

रामकृष्ण औसेकर
सिंहगड रोड, पुणे. मो. 98228 15640

# एक चैतन्य सूर्याचा अस्त जाहला



ज्योतिर्मय साहित्य

१९८६ च्या वर्षाची आठवण अखंड स्मरणात राहील अशी आहे, खुप दिवसा पासून श्री महाराजांच्या मी मागे लागलो होतो की उत्तर भारताची यात्रा करावी ती ही आपल्या सानिध्यात, शेवटी त्यांनी मनांवर घेतले, बरीच त्यांच्या नात्यातील आमच्या नात्यातील मंडळी व इतर मंडळी प्रवासाला तयार झाली, तसे बँकेतील आम्ही दोघे जण होतो, ही सभा सहकुटूंबासह सह परिवार होती. त्या वेळी माझी सत्वपरीक्षा सौ. संजीवनी व तिचे म्हसवडचे भाऊ व दोन भावजया, आमची दोन मुले दोन मुली सौ. आई आणि चूलते त्यांना आम्ही मास्तर म्हणत असु त्यांनी आपल सारं आयुष्य संन्यस्थ राहून भावाचा संसार उभारलेला आणि आम्हाला घडवले, त्यांचे उपकार अखंड स्मरणात राहतील असेच आहेत. श्री महाराजाचे सर्व कुटूंबीया समवेत मोठे महाराज श्री अनंत बुवा महाराज व सौ. ताई महाराज पण बरोबर होते. तेव्हां उत्तर भारत यात्रा श्री महाराजांच्या समवेत घडावी अशी इच्छा होती. त्या प्रमाणे त्यांच्या कृपेने ती घडू शकली. यात्रेचे वर्णन शब्दात करता येणार नाही. विशेष म्हणजे काशी क्षेत्री मनकर्णिका घाटावर सौ. संजीवनी (पत्नी) व इतर तिचे भाऊ व भाऊजयी यांना श्री महाराजांचा मंत्रोपदेश मिळाला असा विलक्षण योग दुर्मिळ असा योग आमच्या कुटूंबाला आला. माणसाच्या आयुष्यात असे योग पुर्व संचिता शिवाय येऊ शकत नाहीत, हे खरे तिर्थ स्थानाचा व पर्यटनाचा उद्देश एवढाच की शरीराला व मनाला विरंगुळा मिळावा. निसर्गरुपी परमेश्वराचा साक्षात्कार व्हावा, व त्यातुनच परमेश्वराची भक्ती उपासना मार्ग आकळता येतो.

प्रतिवर्षा प्रमाणे राक्षसभुवनला दत्त जयंती सोहळा उत्सवासाठी जात असे, उत्सव पाच दिवस चालत असल्यामुळे साधकाला एक वेगळाच अनुभव प्रत्ययास येतो. एका दत्त जयंतीला असा अनुभव आला उत्सव चालुच होता. पहिल्या दिवशी दत्त जन्माचे किर्तन श्री महाराजांनीच केले प्रसाद दर्शन झाल्यानंतर श्री महाराज दत्त मंदिराच्या गाभाऱ्यातुन गेले मी मंदिराच्या वरती बसून सर्व सोहळा पहात होतो. मंदिरात श्री महाराज भक्तांना अनुग्रह देत होते. आणि अचानक त्यांनी मला मंदिरात खाली सोडण्यासाठी एका भक्ताने सांगितले, मला काहीच लक्षात येईना मी मंदिरात गेलो दत्त दर्शन घेतले नी महाराजांचे दर्शन घेतले आणि त्यांनी मला अनुग्रहित केले. अनेक साधक गुरुंच्या शोधात असतात.

गुरुकृपा झाली। ईमारत फळा आली ।।

असा हा दुर्मिळ लाभ ह्या दिवशी झाला. दत्त उपासना म्हणा, पुर्ण संचित म्हणा असा योग भाग्यानेच येतो असे मला वाटले, मला धन्यता वाटली संत दर्शनी हा लाभ। पद्म नाभ जोडीला ।। अशी अवस्था झाली. **(क्रमशः)**




# पाय सुजतात, जाणुन घ्या उपाय.....

ज्योतिर्मय साहित्य

पायांना सूज येणे हि एक सामान्य समस्या आहे. पण ती जरी सामान्य समस्या असली तरी यामुळे आपल्या दैनंदिन आयुष्यावर मोठा प्रभाव पडतो. आपण जास्त हालचाल करू शकत नाही. एकाच ठिकाणी बसून राहावे लागते. जास्त चालू शकत नाही. रोजची कामे करू शकत नाही. अशावेळी आपण एकच प्रार्थना करत असतो की हि सूज लवकर कमी होऊन पाय पूर्ववत होऊ दे. अशा स्थितीत कधी कधी डॉक्टरांकडे जाणे सुद्धा शक्य होत नाही किंवा डॉक्टर कधी कधी उपलब्ध नसतात.

अशी वेळ आल्यास काय करावे...?


तर तुम्ही काही घरगुती उपचार करून पायाची हि सूज कमी करू शकता. तुम्हाला पायाची सूज कमी करू शकतील असे काही लाभदायक उपाय सांगणार आहोत, जे तुम्ही घरच्या घरी करून पायाच्या सुजेपासून आराम मिळवू शकता. चला जाणून घेऊया काय आहेत ते उपचार!

जाडे मीठ म्हणजे हाइड्रेटेड मॅग्नीशियम सल्फेटचे क्रिस्टल असतात, जे स्नायुंमधील वेदनेपासून आराम मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. अर्धा कप जाडे मीठ गरम पाण्याने भरलेल्या एक टब किंवा बादलीमध्ये टाकावे. आता या पाण्यात १० ते १५ मिनिटे आपले पाय बुडवून ठेवावे. रात्री झोपण्यापूर्वी हा उपाय करणे जास्त फायदेशीर ठरत असल्याचे दिसून आले आहे. मिठातील हाइड्रेटिड मॅग्नीशियम सुजेवर हळूहळू परिणाम करून पायांना आराम मिळवून देतं.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

हा उपाय तुम्हाला सर्वांना माहित असेलच आणि कोणत्याही अवयवावर सूज आली किंवा अवयव दुखू लागला, वेदना होऊ लागल्या तर हा सगळ्यात सोप्पा पर्याय आपण वापरून पाहतोच. तर जेव्हा पायाला सूज येते तेव्हा एका स्वच्छ कपड्यात ४ ते ५ बर्फाचे तुकडे घेऊन ज्या ठिकाणी सूज आली आहे त्या ठिकाणी किमान १० मिनिटे तरी शेक द्यावा. बर्फ लावल्याने रक्तप्रवाह अधिक चांगला होतो आणि यामूळेच सूज आणि वेदना सुद्धा कमी होते. डॉक्टरकडे जाण्यापूर्वी आवर्जून हे उपाय वापरून पहा, जर या उपायांनी सुद्धा काही फरक पडत नसले तर मात्र तुम्ही शक्य तितक्या लवकर तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

***



# लघु बोधकथा

*ताटातील अन्न*

*निधी जेवण करीत होती व जेवण करतांना भरपूर अन्न सांडवत होती. ते पाहून माधवी म्हणाली, "किती सांडवतेस गं. तुला माहीत नाही. या अन्नासाठी शेतकरी किती मेहनत करतात ते." माधवी काय बोलते हे निधीला काही समजले नाही. एकदा ती आजोळी गेली व तिनं पाहिलं की तिचे आजोबा आजारी असतांनाही व बाहेर पाऊस सुरु असतांनाही शेतात जात आहेत. तिनं आपल्या आजोबांना प्रश्न विचारला. आजोबा म्हणाले, "बेटा, शेतावर मी गेलो नाही तर रानडुकरं शेतातील माल खावून ध्वस्त करतील. " निधीनं ते ऐकलं. तिला आजोबांच्या बोलण्याचा अर्थ कळला व त्या दिवसापासून तिनं जेवतांना अन्न सांडवणं बंद केलं होतं.*

*बोध-*

*ताटातील अन्न सांडवू नये. त्यासाठी बरेच श्रम करावे लागते.*

# हे समिंदरा..!

ज्योतिर्मय साहित्य

''पारो ओ पारो... मासळी जाळ्यात गावली गो..''

''भारीच झालावं धन्यानु.''

माझा धनी हाये, हाये ओ जातीचा कोली,

त्याच्या जाळ्यात अडकली पारो मासली.

त्याच्या जाल्यात अडकली ही पारो मासली.

माझा घो हायेच जातीचा कोली

रोज त्यांच्या गाण्यानं समिन्दरावर सुरवात व्हायची.

''अरे ओ धन्यानू , सुरमई, पापलेट, हाव का भांगडा कोळंबी हाव ''

''सुरमई गावली ग पारो,''

''असू दे, धन्यानु, काय बी एकविरा आईच्या किरपेने आज बाजार चांगला मिलाला मग झालं तर.''

भाकरी, कोळंबीचे कालवण, अन् सुक्या बोंबलाची चटणी आणलाव धन्यानु तुमच्यासाठी खावणं घेवा अन् मग बाजारात जावा.''

''किती येळ लागल ठाव नाय म्हणून म्हणताव खाऊन घ्यावा.''

नित्य नेमाने सुख समाधानात नांदणारा महादेव कोली पारो अन् तिचा मुलगा पिंटो. पिंटो जेमतेम दहा एक महिन्याच्या नेणता लेकरु कोळीवाड्यात रहात होती. पण एक दिवस नजर लागावी असेच काही झाले. महादेव समुद्रात जाळे टाकण्यासाठी होडीतून समुद्रात गेला. त्याला भान ही नव्हते की आपण खूप दूरवर गेलो. पारो काठावर होती. आणि अचानक वादळ आले.

''पारो पारो'' करून महादेव ओरडू लागला. पारोला महादेवचा अगदी पुसट आवाज येत



होता. काही क्षणानंतर तो आवाज बंद झाला.

इकडून पारोही धन्यानु, धन्यानु माघारी फिरावं म्हणून ओरडत होती. पण काळाला काही वेगळेच मान्य होते. त्या वादळात त्याची होडी हेलकावे घेऊ लागली.

''ये जना, ये राजा आर माझ्या धन्याची मदत करायला होडी घेऊन कुणीतरी जावा की रं..!'' पण एका क्षणात.....

आणि नजरेचे पाते लवते न लवते तो होडी समुद्रात उलटी झाली. थोड्या वेळाने वादळ शांत झाले. दूरवर कुठेतरी पारो महादेव नावाची होडी फक्त हेलकावे खाताना नजरेत पडली. पारो छोट्या पिंटोला घेऊन सूर्यास्तानंतर ही महादेवची वाट पहात समुद्रकाठी बसून राहिली होती.

कोणीतरी तिला म्हटलं,

पारो, समिदर आपला देव आहे. त्या आपल्याला तारतो, त्यो आपला विश्वासघात नाही करणार. पण तेंव्हा सूर्य मावळला तो पारोच्या आयुष्यात अंधार करून गेला. पण तिला आशा होती की तिचा महादेव नक्की एक दिवस तिच्या पिंटो साठी माघारी येईल. दिवसामागून दिवस चालले होते. सोबत तिची आशा ही मावळत चालली होती. पारो ने ही आता नियतीचे म्हणणे मान्य केले होते. असे अनेक दिवस, दिवस म्हण्यापेक्षा वर्षे उलटून गेली. तिची महादेव पारो नावाची होडी ही एक दिवस हेलकावे खातखात महिन्या दोन महिन्यांनी तिच्या पाशी आली. पण महादेव..?

पारो स्वतः मासे पकडून बाजार करून पिंटोला मोठे करत होती. पकडलेल्या मासळीतील एक सुरमई पारो रोज हे समिंदरा..! म्हणून समुद्राला सोडत असे.'' तिच्या महादेव ती आवडायची म्हणून हे माझ्या समिंदरा माझ्या धन्यानु ...! बाप लेकरानु भेट घडू दे .''असे म्हणून ती मासळी पाण्यात सोडत असे. पिंटो तिला रोज प्रश्न विचारत असे



सौ.वैशाली चंद्रकांत महाडिक.
श्री क्षेत्र निनाम-सातारा
सं. क्र.-९७६७४३७९२३

''आयानु तू हे एक सुरमई रोज रोज कुणाला देतास.''

''तुला नाही कळाचं, मोठा झालव की कळेल तुला.''

दहा एक वर्ष झाली, पारोचे रहाट चालू होते. एक दिवस ती समुद्रात जाळे टाकण्यासाठी काठावर आली.

अन् एवढ्यात आवाज आला.

''पारो ओ पारो... मासली जाळ्यात गावली गो..''

''भारीच झालावं धन्यानु..''

माझा धनी हाये, हाये ओ जातीचा कोली जातीचा कोली

त्याच्या जाळ्यात अडकली पारो मासली.

त्याच्या जाळ्यात अडकली ही पारो मासली.

धन्यानु, धन्यानु, पारो आश्चर्यचकित झाली. पण तिने तिच्या धन्याचा आवाज ओळखला होता.

''ये जना, ये राजा ह्यो माझ्या धन्याचाच आवाज आहे बर.''

दीस मावळतीला चालला होता,

''धन्यान्यू, धन्यानु ''करत पारो कपाळाला हात लावत समुद्राच्या पाण्यात शिरली. दिवस मावळतीला चालला होता. अन् महादेवची समोरून येणारी आकृती तिला पाठमोरी भासत होती. अन् अखेर शेवटी कित्येक दिवस करत असलेली पारो ची प्रार्थना आज सफल झाली होती.महादेव पारो आणि पिंटोची अखेर भेट झाली.

क्रमशः

*क्षमस्व, यातून कोणाच्या भावना दुखवायच्या नाहीत. वरील कथेत काही उणिवा किंवा काही शब्दांची अदलाबदल काही त्रुटीही असू शकतात. प्रयत्न केला आहे. मार्गदर्शन केले तर आवडेल.




## श्रीशैलमल्लिकार्जुन

ज्योतिर्मय साहित्य



श्री कार्तिकेय यांची मोरा वरील प्रदक्षिणा पूर्ण होऊन येईपर्यंत श्री गणेशांना दोन मुले ही प्राप्त झाली. कार्तिकेय यांना ही घटना कळली. ते नाराज झाले. व ते क्रौंच पर्वतावर साधनेसाठी जाऊन बसले. त्यांची मनधरणी करून त्यांना परत बोलवावे म्हणून पार्वती मातेने प्रथम नारद मुनिस सांगितले. पण नारद मुनींचेही प्रयत्न वाया गेले. त्यानंतर शिव व पार्वती हे दोघेही क्रौंच पर्वतावर गेले. पण त्याआधीच कार्तिकेय तेथून दूर निघून गेले. पुन्हा येऊन पाहू म्हणून, जवळच श्रीशैल पर्वतावर माता-पार्वती सह शिवप्रभू कायम विराजमान झाले. दर अमावस्येस शिव प्रभु क्रौंच पर्वतावर जातात तर माता पार्वती दर पौर्णिमेस तिथे जाते. अशा रीतीने श्रीशैल पर्वत हाच शिव पार्वतींचा दुसरा कैलास पर्वत ठरला.

मंदिरातील उत्सव

महाशिवरात्री हा सर्वात मोठा उत्सव येथे असतो या उत्सवाच्या काळात हजारो भाविक या मंदिरात दर्शनासाठी येतात.

नवरात्र ब्रह्मरंभा पूजन, शक्ती पूजन हे नवरात्राच्या काळात विशेषत्वाने होते. या काळात दुर्गा सप्तशती पाठ,हवन, भजन, पूजन इत्यादी कार्यक्रम होतात.

संतांच्या भेटी

ज्योतिर्लिंग आणि शक्तिपीठ असे दुहेरी महत्त्व असल्याने येथे आजवर अनेक संतांनी भेटी दिल्या. त्यात आद्य शंकराचार्य हे नावही प्रामुख्याने येते. यांनी येथील वास्तव्यात शिवानंद लहरी या स्तोत्राची रचना केली.

अक्का महादेवी ची कथा

तेराव्या शतकातील, कर्नाटकातील, लिंगायत परंपरेतील महान कवी व योगिनी अक्का महादेवी यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागतो. त्यांचे संपूर्ण जीवन साधना मय आणि साधना शिवमय झाली होती. अक्कानी स्वतःचा संसार स्वीकारला नाही. तेथील राजा कौशल्याच्या दबावा नंतरही त्यांनी विवाह करण्याचे नाकारले. त्या पूर्णपणे विरक्त झाल्या. त्या म्हणत माझे चैतन्य मलिकार्जुनाशी एकरूप आहे.

त्यांच्या अंतरंगात श्रीशैलदेव मला बोलावीत आहे अशी उर्मी जागृत झाली.

(क्रमशः)

# वेळ-अमावस्या उत्सव परंपरा

## कृषीसंस्कृती, परंपरा आणि सामुदायिक एकोपा यांचा अनोखा संगम

ज्योतिर्मय साहित्य

कर्नाटकमहाराष्ट्र सीमाभाग तसेच मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत वेळ-अमावस्या हा पारंपरिक व धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा दिवस १९ डिसेंबर रोजी मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात येत आहे. प्रतिवर्षी मार्गशीर्ष/पौष महिन्यातील अमावस्येला ग्रामीण संस्कृतीत कुलदैवत पूजन, निसर्गपूजन व कृषीरक्षण यांचा सुंदर संगम साधला जातो.

विशेषतः कलबुर्गी, बीदर, सोलापूर, लातूर, भालकी, उदगीर, निलंगा, औसा इत्यादी परिसरात हा उत्सव अत्यंत श्रद्धेने पाळला जातो. या दिवसाच्या पूर्वतयारीसाठी पहिल्या दिवशी विविध पारंपरिक पदार्थांची तयारी केली जाते. भज्जी, आंबील, रोडगे, (विशिष्ट प्रकारची भाकर), खिचडी, वरण-फळं (पिठापासून उकडलेले पदार्थ), कानवले, खीर, पिठापासून बनवलेले दिवे असे अनेक विशिष्ट पदार्थ तयार करून पूजनासाठी सज्जता केली जाते. अनेक



शेतकरी आपल्या शेतामध्ये कडब्यापासून तयार केलेली 'कोपी' (एक प्रकारची झोपडी) उभारून कोपीवर शाल पांघरून पूजनाची व्यवस्था

करतात.

येणाऱ्या दिवशी सकाळी गावातील सर्वजण आपापल्या शेतात जातात. तेथे महालक्ष्मीचे पूजन करून निवेद्य अर्पण केला जातो. त्यानंतर सर्वजण एकत्र बसून पारंपरिक पदार्थांचे भोजन करतात. कोपीवर येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याला आदराने जेवण घालण्याची परंपरा आजही मोठ्या जिव्हाळ्याने पाळली जाते. झोके खेळणे, पतंग उडवणे आदी पारंपरिक खेळांमुळे शेतशिवार आनंदाने फुलून जाते.

संध्याकाळी साधारण सहा वाजल्यानंतर शाल पांघरून सजवलेली 'डाल' (शिंदी झाडापासून विणलेली मोठी टोपली) डोक्यावर घेऊन ग्रामस्थ गावाकडे प्रस्थान करतात. गावातील महालक्ष्मीचे सामूहिक पूजन झाल्यानंतर सर्वजण आपापल्या घरी परततात. महिलावर्ग, तरुणाई व ज्येष्ठ नागरिकांमध्ये या दिवशी विशेष उत्साह पाहायला मिळतो.



अशोक गुरनाळे
छ. संभाजीनगर

पवित्र मानल्या जाणाऱ्या 'वेळ' वनस्पतीचे पूजन, घरगुती देवघरात दीपदान, हळद-कुंकू, ओटी-भरवणी अशा पारंपरिक प्रथांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून जातो. महिलांमध्ये एकमेकींना कुंकू लावून मंगलाशीर्वाद देण्याची परंपरा या दिवशी विशेष रंगतदार होते.

वेळ-अमावस्या हा केवळ धार्मिक दिवस नसून गावकऱ्यांना एकत्र आणणारा, परंपरा जपणारा, आध्यात्मिक चिंतनाचा आणि सामाजिक एकता दृढ करणारा महत्त्वाचा उत्सव आहे. निसर्गाशी असलेले नाते, मातृशक्तीचे पूजन आणि पितृपरंपरेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा, आणि संस्कृती टिकविण्याच्या दृष्टीने हा दिवस ग्रामीण संस्कृतीचा वारसा ठरत आहे.

# आज फिर जीने की तमन्ना है

ज्योतिर्मय साहित्य


शांभवीला आता शंका येऊ लागली. सुजयच्या आजीचे माहेर त्या ठिकाणीच आहे हे विमल ताईंनी सांगितले लगेचच आजी व शांभवी काही दिवसांसाठी हवापालट म्हणून तिकडे गेल्या आजीचे आजारपणाचे निमित्त करून शांभवी तिथे गेली. गावाकडे छानसा वाडा होता आजी देखील खानदानी घराण्यातील असल्याने नोकरचाकर, शेतीवाडी, आणि पंचक्रोशीतील लोक ओळखणारे होते.

शांभवीने सर्व घरातील लोकांना हा प्रकार सांगितला आणि त्या रिसार्ट ची माहिती हवी आहे असे सांगितले. आजीचे भाचे व नातवंडे कामाला लागलीत शेतीच्या कामासाठी तालुक्यला जाताना एक रिसार्ट होत .ते सात आठ किलोमीटर अंतरावर.. फारसं कुणी तिथे दिसत नसे. अधूनमधून शहरातील लोक रहायला येत असतं एवढी माहिती मिळाली. सगळ्यांनी गाडी काढली आणि त्या दिशेने चालले. तिथे गेल्यावर मात्र त्या रिस्टार्ट ला कुलूप होते. नजर जाईल तिकडे भयाण शांतता आणि दाराच्या फटीतून डोकावून पाहिले तर फक्त अंधार काही मागमूस लागत नाही म्हणून सारे परतले. शांभवी तिथली परिस्थिती ऐकून हताश झाली. का कुणास ठाऊक तिच्या मनाला वेगळा संकेत मिळत होता आपणच जाऊन पहावे काय आहे तिथे चूकून एखादा धागा हाती आला तर.. तिचे मन अस्वस्थ झाले.

''घरातील सर्वांना पुन्हा एकदा मला तेथे घेऊन चला, असे तिने सांगितले, सर्वजण पुन्हा तिकडे गेले जाताना घनदाट जंगल, डोंगर आणि निर्मनुष्य रस्ता पाहून शांभवीला थोडी भिती वाटत होती. हया जंगलात सुजयला टाकून तर दिले नसेल, जंगली प्राण्यांनी त्याला काही केलं असेल का? पुढे जाताच तिथे रिसार्ट होते. भोवतीने झाडी आणि दाराला




कुलूप पण पायऱ्यांवर चिखलात माखलेले पावलांचे ठसे ते कसे मघाशी तर दिसले नाहीत., सारे बुचकळ्यात पडले. आता आजूबाजूला शोध सुरू झाला समोरच्या दाट हिरवळीत काही तरी पिवळे चमकदार दिसले.. शांभवी ने ते उचलून घेतले तेव्हा तिला लक्षात आले हा सुजयच्या घडयाळाचा सोनेरी पट्टा तुटून पडला आहे, तिला लगेचच कळालं कारण हे घड्याळ तिने त्याला वाढदिवसाच्या दिवशी भेट दिल होत.तिच्या डोळ्यातून पाणी आले. अजून शोधाशोध करायला हवी सगळ्यांचा विचार केला आणि ते दारापाशी आले.दाराच्या फटीतून फक्त अंधार दिसत होता. खिडकीतून डोकावून पाहिले तर एक कापडाचा तुकडा लोंबकळत होता तो रक्ताने माखलेला होता. खिडकीची तावदाने फोडून ते बाहेर काढले तर सुजयचा शर्ट होता तो.. आता तर पक्की खात्री झाली.. आणि तो दरवाजा कुलूप फोडून उघडला.. आज जाताच झटापट होऊन अस्ताव्यस्त पडलेले साहित्य, खुर्ची, टेबल.. धुळखात पडलेली कोपऱ्यातील अडगळीच्या खोलीबाहेर एक दोरीचा तुकडा, रक्ताचे डाग फरशीवर होते.. आणि अचानक त्या खोलीजवळ येताच आवाज येऊ लागला.. सुजयला एका खुर्चीवर बांधून घातलं होतं आणि तोंडांत बोळा कोंबला होता, अर्धवट बेशुद्ध अवस्थेत तो खुर्चीतून सुटण्याचा प्रयत्न करू लागला होता.. अंगावर जखमा रक्त त्याची अवस्था पाहून शांभवी सुन्न झाली. लगेचच सुजयला सोडवून घेतले व प्यायला थोडं पाणी दिलं.. आणि त्याला तेथून लगेच घरी आणले. आजीला सुजयला पाहताच रडू कोसळले आपली नातसून धाडसाने सुजयला परत घेऊन आली, तिला सगळ्यांचे कौतुक वाटले. सुजय पुरता बरे होईल ह्यासाठी दवाखान्यात दाखल करणे गरजेचे होते. पण त्याच्या सुरक्षिततेसाठी घरीच डॉक्टर बोलवून उपचार सुरू केले. शांभवी काळजी घेत होती, सुजय ही हळूहळू उपचारांना प्रतिसाद देत होता आता तो बऱ्यापैकी चालू लागला. इकडे निवडणूक जवळ आली होती पण सुजय आपल्यामध्ये आहे हे आई बाबांना पण कळू दिले नाही.




सौ.प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर मो. 95525 61612

(क्रमशः)










# पुणे पुस्तक महोत्सव : वाचन संस्कृतीचा कुंभमेळा

**ज्योतिर्मय साहित्य**

पुस्तक पंढरी पुणे( संजय व्यापारी) : दि. १३ ते २१ डिसेंबर २०२५ आशिया खंडातील सर्वात मोठा पुस्तक महोत्सव सध्या पुण्यात फर्ग्यूसन कॉलेज येथे सुरु आहे. राष्ट्रीय पुस्तक ट्रस्ट, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे पुस्तक महोत्सवाचे हे तिसरे वर्ष असून गेल्या तीन वर्षापासून समाजामध्ये वाचन संस्कृती रुजविण्यात पुणे पुस्तक महोत्सवाचे मोठे योगदान आहे. ८०० + पुस्तकांची दालने - सर्व भारतीय भाषांतील साहित्य उपलब्ध. लेखकांसाठी ऑथर कॉर्नर - लेखकांशी संवाद, पुस्तक प्रकाशन. बालकांसाठी चिल्ड्रेन कॉर्नर - चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कार्यशाळा. सांस्कृतिक कार्यक्रम - संगीत, नृत्य, कला सादरीकरणे. छायाचित्र प्रदर्शन व खूप काही... या विद्येच्या माहेरघरात रोज लाखों विद्येचे वारकरी भेट देत आहेत व येथील भेट देणाऱ्यांमध्ये सर्वात मोठा वर्ग तरुण वर्ग म्हणजे १३ ते २४ हा वयोगट मोठ्या प्रमाणात पहावयास मिळाला. हे बघता वाचन संस्कृती तरुण वर्गात चांगलीच फुलत असल्याचे पहावयास मिळते. यावरून वाचा म्हणजे वाचाल हे आता सांगण्याची गरज वाटतं नाही. सध्याच्या पिढीचा तरुणवर्ग अत्यंत हुशार आहे, त्यामुळे वाचन संस्कृती कमी होईल असे बिलकुल वाटतं नाही. हे या चित्ररूपी छायाचित्रामधून सर्वांना नक्कीच कळेल. या पुस्तक महोत्सवामध्ये संपूर्ण भारतामधून नामांकित प्रकाशकांनी सहभाग नोंदवला आहे व त्यांना खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे.






या महोत्सवाच्या माध्यमातून अनेक साहित्यिकांच्या पुस्तकांचे प्रकाशन सुरु आहे, अनेक मान्यवर लेखकांच्या मुलाखती, वेगवेगळ्या विषयावर मान्यवरांचे व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहेत. सर्व भाषांतील दुर्मिळ पुस्तके येथे प्रकाशकांनी उपलब्ध करून दिले आहेत. वाचन संस्कृतीचा हा कुंभमेळा २१ तारखेपर्यंत सुरु आहे, त्याचा जास्तीतजास्त वाचकांनी फायदा घ्यावा असे संयोजकांनी आवाहन केले आहे.









































































हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559